# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:22.11.2025** **वार:शनिवार**

1. जी -20 देशांच्या शिखर परिषदेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी दक्षिण आफ्रिकेत दाखल
2. राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते दुसऱ्या भारतीय कलामहोत्सवाचं उद्घाटन
3. देशभरात कामगारांसाठीच्या चार नवीन कायद्यांच्या अंमलबजावणीला कालपासून सुरुवात
4. नागपूरमध्ये संत्र्यासाठी स्वच्छ रोप केंद्र सुरू करण्याची केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांची घोषणा आणि
5. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामना आजपासून गुवाहाटीमध्ये

**G20**

पंतप्रधान नरेंद्र मोदी जी वीस नेत्यांच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग इथं काल पोहोचले. यावेळी विमानतळावर त्यांचं पारंपरिक पद्धतीनं उत्साहात स्वागत करण्यात आलं. 'ऐक्य, समानता, शाश्वतता' ही या वर्षीच्या जी 20 परिषदेची संकल्पना आहे. परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांची भेट घेतली. उभय देश त्यांच्या व्यापक धोरणात्मक भागीदारीची पाच वर्षे पूर्ण करत असताना, द्विपक्षीय संबंधांमध्ये लक्षणीय वाढ आणि विविधतेबद्दल दोन्ही नेत्यांनी समाधान व्यक्त केलं. संरक्षण आणि सुरक्षा, महत्त्वाची खनिजे, व्यापार आणि गुंतवणूक, शिक्षण यासह विविध क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्य मजबूत करण्यावर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली.

पंतप्रधानांनी दक्षिण आफ्रिकेतील बहुराष्ट्रीय इंटरनेट आणि तंत्रज्ञान कंपनी, नॅस्पर्सचे अध्यक्ष कूस बेकर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी फॅब्रिसियो ब्लोईसी यांच्यासोबतही बैठक घेतली. त्यांनी भारताच्या डिजिटल परिसंस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता , स्टार्टअप आणि अवकाश क्षेत्रात गुंतवणूक वाढवण्यावर तसंच ग्राहक बाजारपेठ आणि तंत्रज्ञानात नवीन मार्ग शोधण्यावर चर्चा केली. नॅस्पर्सच्या भारतातील यशामुळं देशातील व्यवसाय सुलभता आणि स्टार्टअप परिसंस्थेची ताकद दिसून येत असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल सिकंदराबाद इथल्या राष्ट्रपती निलायम इथं दुसऱ्या भारतीय कलामहोत्सवाचं उद्घाटन केलं. गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, गोवा, दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव यांच्या समृद्ध आणि वैविध्यपूर्ण सांस्कृतिक वारशाचं सादरीकरण करण्याचा या महोत्सवाचा उद्देश आहे. हा महोत्सव नऊ दिवस चालणार आहे. भारतीय कला महोत्सवाच्या पहिल्या वर्षी लोकांना ईशान्य भारतातील सांस्कृतिक वारशाची ओळख करून दिल्याची आठवण यावेळी राष्ट्रपतींनी सांगितली. महोत्सवात या वर्षी पश्चिम भारतातील चैतन्यशील परंपरा पाहण्याची संधी मिळेल आणि पर्यटकांना या प्रदेशाच्या लोकसंस्कृतीची सखोल ओळख होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. भारतीय कला महोत्सवासारखे कार्यक्रम देशाच्या विविध भागातील लोकांना एकमेकांना समजून घेण्यास, दृष्टिकोन व्यापक करण्यास आणि भारताच्या विविध परंपरांबद्दल आदर निर्माण करण्यास प्रोत्साहित करतात असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**अमित शाह-बीएसएफ**

निवडणूक आयोग करत असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष पुनरीक्षणाला 'मतदार याद्यांचं शुद्धीकरण' असं म्हणत या प्रक्रियेला विरोध करणाऱ्या आणि बेकायदेशीर घुसखोरांना पाठिंबा देणाऱ्या राजकीय पक्षांवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी निशाणा साधला. गुजरातमधील भूज इथं सीमा सुरक्षा दलाच्या हीरक महोत्सवी समारंभाला संबोधित करताना ते काल बोलत होते. देशातील प्रत्येक

घुसखोराला हाकलून लावण्याचा सरकारचा दृढ संकल्प असल्याचं प्रतिपादन शाह यांनी केलं. लोकशाही बळकट करण्यासाठी पुनरीक्षणाला पूर्ण पाठिंबा देण्याचं आवाहन त्यांनी जनतेला केलं.

**श्रमसंहिता**

कामगारांसाठीचे 4 नवीन कायदे कालपासून देशभरात लागू झाल्याची घोषणा केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी केली. वेतन संहिता 2019, औद्योगिक संबंध संहिता 2020, सामाजिक सुरक्षितता संहिता 2020, आणि व्यावसायिक सुरक्षितता, आरोग्य आणि कामाच्या परिस्थिती विषयक संहिता 2020 या नवीन कायद्यांमुळे कामगारांच्या हिताचं रक्षण होईल; देशातील प्रत्येक कामगाराला प्रतिष्ठेनं जीवन जगता येईल असं मांडवीय यांनी म्हटलं आहे. जुन्या कायद्यांमधल्या तरतुदी कालबाह्य झाल्या असून नवीन कायद्यांमुळे कामगारांना चांगलं वेतन, विमा सुरक्षितता आणि इतर कल्याणकारी योजनांचा लाभ मिळेल, असं मनसुख मांडवीय म्हणाले. या कायद्यांच्या अंमलबजावणीमुळे वेळेवर किमान वेतन, नियुक्तीपत्र, महिलांना समान वेतन, 40 कोटी कामगारांना विमा संरक्षण, तसंच निश्चित कालावधीसाठी कामावर ठेवलेल्यांना वर्षभरानंतर ग्रॅच्युईटीचा लाभ मिळेल. 40 वर्षापेक्षा जास्त वयाच्या कामगारांना वार्षिक आरोग्य तपासण्या मोफत करता येतील. निर्धारित वेळेपेक्षा जास्त वेळ केलेल्या कामासाठी दुप्पट वेतन तसंच धोकादायक परिस्थितीत काम करणाऱ्या कामगारांना आरोग्य विमा मिळण्याची तरतूद या कायद्यांमध्ये आहे. या संहिता स्वातंत्र्यानंतरच्या सर्वात जास्त सर्वसमावेशक आणि प्रगतिशील सुधारणा असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. गृहमंत्री अमित शहा यांनीही देशातील कामगारांचं अभिनंदन केलं आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे महासंचालक गिल्बर्ट एफ हौंगबो यांनी भारतातील कामगार संहितेच्या सुलभीकरणाचं स्वागत केलं आहे.

**ॲग्रोव्हिजन**

महाराष्ट्रातल्या विदर्भातील शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानाची, जोडधंद्यांची माहिती व्हावी त्याचा उपयोग त्यांच्या उत्पन्न वाढीसाठी व्हावा आणि त्यांची शेती लाभदायक व्हावी या हेतूनं आयोजित 16 त्या ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन काल केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांच्या हस्ते नागपूरमध्ये झालं. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

नागपूरमधील संत्रा उत्पादकांसाठी स्वच्छ रोप केंद्र सुरू करण्याची घोषणा यावेळी चौहान यांनी केली. त्यासाठी 70 कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार  असल्याचं त्यांनी सांगितलं. संत्र्यांच्या रोपवाटिकेसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य राज्य शासन करेल असं आश्वासन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलं. शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, पाणी तसंच खताचा योग्य वापर आणि बचत करून शेतकऱ्यांना आपलं उत्पन्न वाढवता येईल असं केंद्रीय मंत्री  नितीन गडकरी यांनी यावेळी सांगितलं. शेतकऱ्यांनी उत्पादन खर्च कमी करून त्याचप्रमाणे रासायनिक खताचा वापर कमीत कमी करून कृषीमालांचं थेट विपणन केल्यास त्यांना लाभ होईल असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**राजनाथ**

सध्याच्या युगात जागतिक संघर्षांना तोंड देण्यासाठी संयुक्त राष्ट्र तसंच आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या पुनर्बांधणीची गरज संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केली आहे. लखनौ इथं जगभरातील मुख्य न्यायाधीशांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत काल ते बोलत होते. इस्रायल-हमास आणि युक्रेन-रशिया सारख्या जागतिक संघर्षांमध्ये आणि सुदानमध्ये उद्भवणाऱ्या मानवताविरोधी संकटांमध्ये संयुक्त राष्ट्र अधिक मजबूत भूमिका बजावू शकले असते असं सांगून ते म्हणाले की, त्यांच्या कृतीतील ही तफावत संयुक्त राष्ट्रांच्या उद्दिष्टांचा अभाव दर्शवत नसून ती जागतिक राजकारणातील गुंतागुंत, प्रमुख शक्तींचा प्रभाव आणि संस्थात्मक प्रक्रियांच्या मंद गतीमुळे जाणवते. या आंतरराष्ट्रीय संस्थेला सक्रिय ठेवण्यासाठी संयुक्त राष्ट्रांमध्ये संतुलित प्रतिनिधित्व ही काळाची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं.

**अश्विनी वैष्णव**

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल सिंगापूरमधल्या उद्योग संस्था आणि अधिकाऱ्यांबरोबर सेमीकंडक्टर प्रकल्पांसाठी तंत्रज्ञ आणि अभियंत्यांच्या कौशल्याबाबत चर्चा केली. यानंतर त्यांनी सिंगापूरचे उप प्रधानमंत्री गन किम योंग यांची भेट घेऊन दोन्ही देशांमधल्या उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रात द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यावर बोलणी  केली. सिंगापूर सेमिकंडक्टर उद्योग संघटनेबरोबर भारताची भागीदारी होत असल्याची महिती त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात दिली आहे.

**<u>दुबई विमान अपघात</u>**

दुबई एअर शोमध्ये कसरतीच्या दरम्यान काल भारतीय हवाई दलाचं तेजस विमान कोसळून वैमानिक विंग कमांडर नमांश स्याल यांचा मृत्यू झाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी वैमानिक स्याल यांच्या मृत्यूबद्दल दुःख व्यक्त केलं असून या प्रसंगी देश स्याल यांच्या कुटुंबासोबत खंबीरपणे उभा आहे असं म्हटलं आहे. अपघाताचं कारण शोधण्यासाठी चौकशी समिति स्थापन करण्यात आली आहे.

**<u>बॅडमिंटन</u>**

बॅडमिंटनमध्ये, भारताच्या लक्ष्य सेननं ऑस्ट्रेलियन खुल्या पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. सिडनी इथं काल झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत लक्ष्य सेननं आयुष शेट्टीचा 23-21, 21-11 असा पराभव केला. अंतिम फेरीत स्थान मिळविण्यासाठी आज त्याची लढत तैवानच्या चाऊ तिएन-चेन बरोबर होणार आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतला दुसरा आणि अंतिम सामना आजपासून गुवाहाटी इथं होणार आहे. सकाळी 9 वाजता सामना सुरु होईल. कोलकता इथं झालेल्या पहिल्या सामन्यात कर्णधार शुभमन गिल जायबंदी झाल्यामुळे या सामन्यात कर्णधारपदाची जबाबदारी ऋषभ पंतवर सोपवली आहे. पहिला सामना दक्षिण अफ्रिकेनं 30 धावांनी जिंकला होता.

**<u>हवामान</u>**

मध्य प्रदेशातील काही भागात आज शीतलहर येण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. अंदमान आणि निकोबार बेटं, केरळ, माहे, तामिळनाडू, पुदुचेरी आणि कराईकलच्या काही भागात वीजांसह मुसळधार पाऊस आणि वादळ होण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. येत्या 25 तारखेपर्यंत अंदमान आणि निकोबार बेटांवर हवामानाची परिस्थिती अशीच राहण्याची अपेक्षा आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार